# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. २१ डिसेंबर, २०२०

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

**जळगाव दि.२१ ( प्रतिनिधी ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ प्रशाळा व संलग्नित महाविद्यालयातील एम.एस्सी.(सर्व विषय) आणि एम.ए. (भूगोल) प्रथम वर्ष या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची पहिली फेरी उद्या दि.२२ व २३ डिसेंबर, २०२० रोजी होणार असून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झालेल्या प्रवेश फेरीच्या यादीतील संबंधित विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालय/प्रशाळेत मुळ कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

एम.एस्सी. सर्व विषय व एम.ए.भुगोल प्रथम वर्षासाठी केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन प्रवेश अर्ज मागविण्यात आले होते. सोमवारी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेशाच्या पहिल्या फेरीतील विद्यार्थ्यांची नावे व त्यांना देण्यात आलेले महाविद्यालये/प्रशाळेची यादी जाहीर करण्यात आली. विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे ही कळविण्यात आले आहे. या यादीप्रमाणे संबंधित विद्यार्थ्यांनी महाविद्यालय/प्रशाळेत मुळ कागदपत्रे व त्याच्या छायांकितप्रती घेऊन स्वत: हजर राहणे आवश्यक आहे. प्रवेश शुल्क ऑनलाईन स्विकारले जाणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी डेबीट कार्ड अथवा नेट बँकिगचा तपशिल सोबत ठेवणे आवश्यक आहे. तसेच कोविड-१९चा प्रादुर्भाव लक्षात घेता या संबंधितीचे सर्व नियम पाळणे बंधनकारक राहतील अशी माहिती प्रवेश समितीचे अध्यक्ष प्रा.ए.बी.चौधरी यांनी दिली.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी